# मुंबई विद्यापीठ

क्रमांक/संलग्नता/आयसीसी/२०१६-१७/ 15

## परिपत्रक

सर्व संलग्नीत विधी पदवी व शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयांचे प्राचार्य यांना कळविण्यात येते की, सदर व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रवेश राज्य सामायिक प्रवेश परिक्षा प्रक्रियेमार्फत एक खिडकी पध्दतीने करण्यात येणार आहेत. यासंदर्भात विधी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष वगळता अन्य वर्षामध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांना, जरी त्यांनी सीईटीद्वारे व कॅप मार्फत प्रवेश घेतला नसला तरी देखील संस्था बदलाचे नियम लागू आहेत किंवा कसे याबाबत विधी व न्याय विभागाने खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत.

"The students who have sought the clarification have already completed the first year of three years LL.B. course and wished to transfer to an aided Institution. They have not appeared for the Central Admission Process. Therefore, it can be said that Rule 17 for the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admission to the Full Time Professional Under graduate Law Courses) Rules, 2016 are not applicable for the educational year prior to 2016-17."

उपरोक्त अभिप्रायाबद्दल विद्यार्थ्यांना सुचित करण्यात यावे.

23/8/16

(डॉ. एम. ए. खान)
कुलसचिव

मुंबई-४०० ०३२.
23 ऑगस्ट,२०१६

F:\Pigulkar\Opening New College\List Opening 2012-13\Opening 2012-13/Circular

# मुंबई विद्यापीठ

क्रमांक/संलग्नता/आयसीसी/२०१६-१७/15

## परिपत्रक

सर्व संलग्नीत विधी महाविद्यालयांचे प्राचार्य यांना कळविण्यात येते की, शासनाने राज्याच्या विधी महाविद्यालयांच्या नोंदणी प्रक्रियेतील अडचणींमुळे विधी पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया नियोजीत वेळापत्रकापेक्षा पुढे ढकलली आहे. त्यामुळे बारावी उत्तीर्ण होवून विधी पाच वर्षीय अभ्यासक्रमात प्रवेश घेऊ इच्छीणा-या विद्यार्थ्यांनी, विधी प्रवेश प्रक्रिया लांबणीवर पडल्याने चालू शैक्षणिक वर्षासाठी इतर अभ्यासक्रमांना प्रवेश घेतले आहेत. विधी अभ्यासक्रमाला प्रवेश मिळाल्यानंतर सदर विद्यार्थी इतर अभ्यासक्रमातील प्रवेश रद्द करतील अशा विद्यार्थ्यांनी प्रवेश रद्द न करण्याबाबतचे घोषणा पत्र सादर करण्याबाबत सक्ती करू नये. तसेच विधी पदवी अभ्यासक्रमात प्रवेश घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांना असे घोषणा पत्र महाविद्यालयांस सादर करण्याबाबतची सक्ती करू नये, अथवा हा कालावधी विधी ५ वर्षीय अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया पूर्ण होई पर्यंत वाढविण्यात यावा.

(डॉ. एम.ए. खान)
कुलसचिव

मुंबई-४०० ०३२.
23 ऑगस्ट, २०१६